# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २८.०४.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २७.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १४ केसेसमध्ये १४ ईसमावर कारवाई करून एकुण १८,१२१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण २८,६०५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६०० वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२१,७००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) राणा प्रतापनगर पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक २७.०४.२०२६ चे २३.५० वा. चे सुमारास, राणाप्रतापनगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, रोशन कोडापे नावाचा हद्दपार ईसम हा प्रज्ञाशिल बुध्द विहारजवळ वावरत आहे. अशा माहितीवरून राणाप्रतापनगर पोलीस तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा ईसम दिसून आला. त्यास पोलीसांनी हटकले असता तो पोलीसांना पाहुन पळू जावू लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन, पंचासमक्षा त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रोशन ज्ञानेश्वर कोडापे, वय २७ वर्षे, रा. शिव मंदीर जवळ, सुभाष नगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ११/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतिषकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. सोनेगाव विभाग) व वपोनि. पंकज बोडसे,यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. अप्पासाहेब पडळकर, पोहवा. दिनेश भोगे, पोअं. अलेक्झेंडर डिक्रुज व आनंद काबलिया यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे पाचपावली :— आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपी पत्नीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादीचा मुलगा नामे मोहित जितेंद्र उर्फ चंद्रबोसे देसाई, वय ३५ वर्षे यांचे कोर्ट मॅरेज आरोपी श्रीमती पुजा मोहित देसाई, वय ३० वर्षे, रा. बापदेव मौदा, ता. जि. नागपुर, ह.मु.— सुरत (गुजरात) हिचेसोबत झाले होते. दिनांक २१.०७.२०२५ रोजी आरोपी पत्नीने फिर्यादीचे मुलासोबत घरगुती कारणावरून भांडण करून पतीचे घरून निघून गेली होती. तेव्हा आरोपी पत्नीने तिचे पतीला ''सोडचिठ्ठी समज'' अशी धमकी दिली होती. त्यानंतर चार ते पाच महिन्यांनी आरोपी पत्नी ही तिचे पतीचे संपर्कात आली व लष्करीबाग, नागपूर येथे एक महिन्यापर्यंत पतीसोबत राहीली होती. त्यावेळीसुध्दा कोणत्यातरी कारणावरून आरोपी पत्नीने तिचे पतीसोबत भांडण करून माहेरी निघून गेली होती. आरोपीचे पतीने आरोपीला खुप समजविण्याचा प्रयत्न केला. तसेच, फोनवरून आरोपी पत्नीला आत्महत्या करणेबाबत मॅसेजही टाकले. परंतु, आरोपी पत्नी समजुन घेण्याच्या मानसिकतेत नव्हती. तसेच, आरोपी पत्नीने तिचे पतीचा फोन नंबर ब्लॉक करून संपर्क तोडून राहत होती. आरोपी पत्नी ही नेहमी भांडण करून, वारंवार घर सोडून गेल्यामुळे फिर्यादीचा मुलगा हा मानसिक दबावाखाली राहत होता. आरोपी पत्नीचे अशा वागण्यामुळे कंटाळुन फिर्यादीचे मुलाने दिनांक १२.०२.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या केली होती.

याप्रकरणी पोलीस ठाणे पाचपावली येथे अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती. अकस्मात मृत्युचे चौकशीत तसेच, फिर्यादी निलीमा जितेंद्र उर्फ चंद्रबोसे देसाई, वय ५६ वर्षे, रा. प्लॉट नं. २३७, महेंद्र नगर, विदर्भ प्रिमियम बिल्डींगचे बाजूला, पाचपावली, नागपूर यांनी आरोपी सुनेविरूध्द तक्रार दिली की, आरोपी महीलेने तिचे पतीसोबत वारंवार झगडा—भांडण करून, तसेच घर सोडून माहेरी जावून, सोडचिठ्ठीच्या धमक्या देवून तसेच, पतीचा मोबाईल क्रमांक ब्लॉक करून संपर्क तोडून मानसिक छळ केल्याने, फिर्यादीचे मुलास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.

फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. विनायक बुवा ७७७००७८९२३ यांनी आरोपी पत्नी विरूध्द कलम १०८ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कळमना :— गोडावून फोडून चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी नंदलाल नटवरलाल लाहोटी, वय ४५ वर्षे, रा. फ्लॅट नं. ४०५, तुलसी अपार्टमेन्ट, टेलीफोन एक्सचेंज चौक, लकडगंज, नागपुर यांचे पोलीस ठाणे कळमना हद्दीत, डिप्टी सिग्नल, रेल्वे क्रॉसिंगचे बाजूला मसाल्याचे गोडावून आहे. दिनांक २५.०४.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक २७.०४.२०२६ चे १०.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी त्यांचे गोडावूनला कुलूप लावून आपले घरी गेले होते. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे गोडावूनचे भिंतीचे टिन काढून, आंत प्रवेश करून, कॅबीनमधील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले रोख ९,५५,०००/—रू. चोरून नेले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि सौरभ बूजंगे ९०२२१८५९१८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात)**

**पोलीस ठाणे सिताबर्डी :—** दिनांक २७.०४.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, एक अनोळखी महिला वय अंदाजे ७० वर्षे वयाच्या बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना दक्ष नागरिकांनी

उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २६.०४.२०२६ चे २१.०० वा. सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतक महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. अमोल नागरीक यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे मानकापूर :—** उत्कर्ष हरीष शेंडे, वय २३ वर्षे, रा. गंजीपेठ, महाराजा फर्निचर जवळ, कांझीपूरा, नागपूर हे दिनांक २२.०४.२०२६ चे ०२.३० वा. पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, उंची— ६ फुट, केस— काळे, अंगात— मळकट फुलबाहीचे शर्ट व गुलाबी रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— दारूच्या सवईचे व मानसिक रूग्ण आहेत..

**२) पोलीस ठाणे भांडेवाडी :—** आकाश प्रशांत कानमोळे, वय २७ वर्षे, रा. चंद्रकांत पौनिकर यांचे घरी किरायाने, झाडे चौक, लालगंज, नागपूर हे दिनांक ०६.०४.२०२६ चे १२.०० वा. पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतील त्याचे मावशीचे घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ६ इंच, केस— काळे, मिशी— जाड, अंगात— पांढरे रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे भांडेवाडी :—** कपील बंडू काकडे, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. १६४, नागेश्वर नगर, भांडेवाडी, नागपूर हे दिनांक ११.०४.२०२६ चे ०७.३० वा. पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ६ इंच, केस— काळे, अंगात— गुलाबी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



उत्कर्ष



आकाश



कपील

**स्वा/—**
**( मनोज राऊत )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**